Government of Maharashtra

MAGNETIC
MAHARASHTRA

CONVERGENCE 2018

Global Investors Summit - Feb 18-20

# रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स अँड ज्वेलरी, सुक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरीता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले (Parks) धोरण

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

उद्योग विभाग

Government of Maharashtra

# रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स अँड ज्वेलरी, सुक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरीता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले (Parks) धोरण –2018

## 1. प्रस्तावना :

A. भारतातील स्थानिक वस्त्रोद्योग आणि पोशाख उद्योगाची उलाढाल सन 2014 मध्ये 67 बिलियन अमेरिकन डॉलर्स इतकी होती आणि सदर उद्योग सन 2021 पर्यंत 141 बिलियन अमेरिकन डॉलर्स पर्यंत वाढणे अपेक्षित आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या COMTRDE या संघटनेने या संदर्भात 2014 मध्ये प्रसिध्द केलेल्या आकडेवारीनुसार भारत हा वस्त्रोद्योग व कपडा निर्याती करीता जागतिक स्तरावर दुसऱ्या क्रमांकावर होता. यामध्ये तयार कपड्यांचा वाटा 41% सह सन 2015 मध्ये सर्वाधिक होता. मात्र फक्त कपड्यांचा विचार करता जागतिक निर्यातदारामध्ये भारताचा सहावा क्रमांक होता. सन 2012 मध्ये एकूण निर्यातीत भारताच्या पोशाखाचा (कपडयांचा) वाटा फक्त 5% होता. उलटपक्षी बांगला देशाच्या एकूण निर्यातीत 93%, श्रीलंकेच्या एकूण निर्यातीत 45% आणि पाकिस्तानच्या एकूण निर्यातीमध्ये 19% इतका वाटा होता.

B. रेडिमेड गारमेंट उत्पादन क्षेत्र हा वस्त्रोद्योग किंमत साखळीतील अंतिम टप्पा आहेत व मूल्यवृध्दीमध्ये त्यांचे सर्वांधिक योगदान आहे. कमी भांडवली गुंतवणूक आणि जास्त कामगारांची आवश्यकता असलेले हे क्षेत्र आहे. जागतिक बँकेच्या अहवालानुसार, चीन देशाकडून रेडिमेड गारमेंट उत्पादनाच्या किंमतीत जर 10% वाढ झाली तर, भारतातील रेडिमेड गारमेंट निर्मीती उद्योगामध्ये कमीत कमी 1.2 दशलक्ष इतक्या रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होवू शकतात.

C. रेडिमेड गारमेंट निर्मिती उद्योगामध्ये शहरी, निम–शहरी व ग्रामीण भागातील रोजगारामध्ये स्त्रियांचा हिस्सा हा त्यांच्या इतर उद्योगातील हिश्श्यापेक्षा खूप अधिक असल्याने याचा सर्वांधिक फायदा स्त्रियांना होणार आहे.

D. रोजगार निर्मितीची प्रचंड क्षमता असल्या कारणाने रेडिमेड गारमेंट निर्मिती उद्योग क्षेत्रास भक्कम पाठींबा देण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील विकसनशील (Under Developed) प्रदेशांतील दरडोई उत्पन्नात वाढ होण्यासाठी उपयुक्त ठरणारी ही बाब आहे. मराठवाडा व विदर्भ या कापूस उत्पादक पट्टयामध्ये मोठ्याप्रमाणावर उत्पादन आधारित रोजगार निर्माण करण्यासाठी हे क्षेत्र उपयुक्त ठरणारे आहे.

E. भारतात तयार कपडयांची मागणी तीन प्रमुख स्त्रोताद्वारे प्राप्त होते – घरगुती वापर, घरगुती व्यतिरिक्त क्षेत्र (संस्थात्मक, औद्योगिक आणि तांत्रिक क्षेत्र) आणि निर्यातक्षेत्र. घरगुती क्षेत्रामध्ये तयार कपडयांचा सर्वाधिक हिस्सा उपभोगला जातो आणि भारतात तयार कपडे (60%) त्यानंतर घरगुती वापराव्यतिरिक्त क्षेत्र (21%) आणि तद्नंतर निर्यात क्षेत्र (19%) असा क्रम लागतो. मुंबई प्रामुख्याने उच्च प्रतीचे आणि नवीन पध्दतीचे कपडे (फॅशन गारमेंट) यासाठी निर्यात केंद्र आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या फॅशन ब्रँडकडून मिळालेली कंत्राटे याचा मुंबईच्या रेडिमेड गारमेंट उद्योग व्यवसायामध्ये फार मोठा हिस्सा आहे. उच्च मुल्यवृध्दीचा (High Value addition) या व्यवसायात समावेश असून विकासाच्या प्रचंड संधी उपलब्ध आहेत. देशातील इतर वस्त्रोद्योग समुहांमध्ये तिरुपुर, लुधियाना, बेंगलुरु, दिल्ली/नोएडा/गुरगांव, कोलकाता, जयपूर आणि इंदोर यांचा समावेश आहे. तिरुपुर, लुधियाना आणि कोलकाता ही कौटुंबिक वापराच्या तयार कपड्यांची प्रमुख केंद्रे आहेत तर बेंगलुरु, दिल्ली/नोएडा/गुरगांव, मुंबई, जयपुर आणि इंदोर ही विणलेल्या कपड्यांसंदर्भात प्रमुख केंद्रे आहेत.

F. जेम्स अँड ज्वेलरी या क्षेत्राचा, भारताच्या जीडीपी (GDP) मधील वाटा 6.7% इतका आहे आणि भारताच्या परकीय चलन मिळकतीमध्ये फार मोठा सहभाग आहे. सन 2015-16 या वर्षामध्ये या क्षेत्रातील निर्यातीतून अंदाजे 38.6 अब्ज अमेरिकन डॉलर इतका महसूल मिळवून त्याने, या क्षेत्रास पेट्रोलियम उत्पादनानंतर निर्यात क्षेत्रामधील दुसऱ्या मोठया क्रमांकावर नेले आहे. संशोधन आणि बाजार पेठेतील अंदाजानुसार, भारतातील 2014-19 या कालावधीत जेम्स अँड ज्वेलरी बाजारपेठेत वाढीचा दर (CGR) हा अंदाजे 15.95 % इतका अपेक्षित आहे. सदरचे क्षेत्र सर्वाधिक गतीने वाढणाऱ्या क्षेत्रापैकी एक क्षेत्र असून प्रचंड रोजगार निर्मिती करण्याची क्षमता असल्याने, महाराष्ट्रात हे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर विकास आणि रोजगार निर्मिती करण्याची क्षमता उपलब्ध करुन देणारे आहे.

G. महाराष्ट्र विशेषत: मुंबई हे हिरे व्यापार (Diamond Trade), डायमंड कटींग (Diamond cutting) आणि चकाकी (Polishing) जडजवाहिर उत्पादन आणि निर्यात यासाठी हिरे व्यापाराचे प्रमुख केंद्र आहे. हे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असंघटित (Un-organized) स्वरुपाचे आहे आणि यामध्ये मोठ्या संख्येने लघु उत्पादकांचा समावेश आहे. सदरचे उद्योग घटक हे प्रामुख्याने शहरी भागात स्थित असून या ठिकाणी किफायतशीर दरात जागेची उपलब्धता ही फार जटील समस्या आहे. त्यामुळे अशा घटकांच्या वाढीबाबत आव्हानास समोरे जावे लागणार आहे.

H. देशाची इलेक्ट्रॉनिक्स हार्डवेअरची गरज फार मोठी असून, आता या क्षेत्रातील मागणीची पूर्तता करण्यासाठी उत्पादकता वाढीस चालना देण्यात येत आहे. इलेक्ट्रॉनिक्स हार्डवेअर व सूक्ष्म अभियांत्रिकी घटक हे विशेषत: नागरी भागात स्थित असल्याने व मोठ्या प्रमाणात कामगार वर्गास रोजगार पुरवित असल्याने या क्षेत्रांच्या गरजा सारख्याच आहेत. या घटकांच्या वाढीमध्ये उत्पादनासाठी किफायतशीर दरात जमिनी मिळविणे हे मोठे आव्हान आहे.

## 2. धोरणाची उद्दीष्टे :-

A. महाराष्ट्राला जागतिक रेडिमेड गारमेंट उत्पादन आणि लोकप्रिय झालेले ब्रँडस् यांचेसाठी सर्वाधिक पसंती असलेले ठिकाण बनविणे. तसेच सूक्ष्म,लघू व मध्यम उपक्रम जे या क्षेत्राचा एक मोठा हिस्सा आहे त्यांची मोठ्या प्रमाणात वाढ आणि विकास करण्यासाठी सुलभीकरण करणे,

B. जागेच्या उपलब्धतेशी संबंधित त्यांच्या प्रमुख बाबींबाबत विचार करुन संपूर्ण कामगारांच्या क्षेत्रासाठी जोमदार वातावरणाची निर्मिती करणे,

C. जेम्स व ज्वेलरी उत्पादन आणि निर्मीतीत महाराष्ट्र हे महत्वाचे केंद्र असून, या विभागातील वाढ आणि रोजगार निर्मिती क्षमतेची महत्तम पातळी गाठण्यासाठी सदर धोरणान्वये सुलभीकरण करणे,

D. सुक्ष्म इलेक्ट्रॉनिक व अभियांत्रिक घटकाकरीता फ्लॅटेड गाळा उपलब्ध करून या क्षेत्राकरीता प्रोत्साहीत करणे.

## 3. रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स अँड ज्वेलरी, सुक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटकांपुढील आव्हाने :-

या घटकांना आज पुढील आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.

A. नागरी क्षेत्रांमध्ये स्थित विशेषत: उच्च प्रतीची वस्त्रे उत्पादनातील उद्योग घटकांसाठी किफायतशीर दरामध्ये जागेची उपलब्धता.

B. सदरचे क्षेत्र हे मोठ्या प्रमाणावर असंघटित असल्याने या क्षेत्रातील कामगारांच्या कामाची परिस्थिती उंचावण्याची आवश्यकता.

C. कामाच्या ठिकाणच्या जवळ, उत्पादन करणाऱ्या कामगारांना, राहण्यासाठी आरोग्यदायी राहण्याच्या जागेची अनुपलब्धता.

D. कामगार संबंधात कायद्यानुसार जादा कामाच्या कालावधी, महिला कामगारांच्या रोजगारी आणि इतर बाबी, कामगार संबंधात कायद्यानुसार असलेल्या निर्बंधता (Restrictions).

E. उच्च मूल्याच्या भांडवलाची उपलब्धता.

## 4. पात्र उद्योग घटकांची व्याख्या :-

A. या धोरणाच्या अनुषंगाने रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स अँड ज्वेलरी, सुक्ष्म, इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटकांची व्याख्या;-

या धोरणांतर्गत घटक म्हणजे, जे उत्पादन घटक कापडाचे रुपांतर वापरण्यायोग्य रेडिमेड गारमेंट, गाद्या, गालिचे, आच्छादणे, पडदे, वेबुट्टीदार कापड इत्यादी मध्ये करतील, तसेच यामध्ये पॅकींग करण्यासाठी आणि दरम्यानच्या सर्व प्रक्रियासाठी वापरण्यात आलेल्या तयार कपडयांचा देखील समावेश असेल. घटकांनी वैध उद्योग आधार/औद्योगिक उद्योजकतेबाबतची कागदपत्रे धारण केलेली असावीत.

त्याचप्रकारे वैध उद्योग आधार (IEM) औद्योगिक उद्योजकतेबाबतची कागदपत्रे धारण करणारे जडजवाहिरेंचे उत्पादन, पैलू पाडणे आणि रत्नांना चकाकी आणणे, पॅकेजिंगचे उत्पादक युनिटस् यांना जेम्स अँड ज्वेलरी युनिटस् म्हणून मानले जातील.

तसेच लहान अभियांत्रिकी घटक आणि महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण-2016 मधील परि. 9 मध्ये नमुद केलेल्या व केंद्र शासनाच्या अधिसूचित केलेल्या इलेक्ट्रॉनिक्स रचना प्रणाली व उत्पादक उद्योगांतर्गत यादीमध्ये मोडणाऱ्या सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स घटक व याकरीता स्थापित फ्लॅटेड गाळायुक्त पार्कमध्ये कार्यरत असलेल्या घटकांचा समावेश असेल.

B. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने विकसित केलेली औद्योगिक क्षेत्रे व ग्रामीण भागातील फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुलांच्या (Parks) विकसनाकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) हे विशेष नियोजन प्राधिकरण असेल.

C. रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स अँड ज्वेलरी, सुक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरीता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले पार्क उभारणीकरीता पात्रता :

जमीन मालक अथवा त्यांनी नियुक्त केलेला विकासक अथवा कोणतेही कायदेशीर अस्तित्व असलेली कंपनी.

अथवा ज्याचेकडे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडील 30 वर्षाच्या भाडेपट्टयाचा कालावधी शिल्लक आहे असा भाडेपट्टाधारक हे रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स अँड ज्वेलरी, सुक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरीता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले पार्कच्या उभारणीसाठी पात्र राहतील.

D. **पूरक सेवा/सुविधा :-**

पूरक सुविधा म्हणजे रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स अँड ज्वेलरी, सुक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरीता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले व्यवसाय करण्यासाठी पूरक ठरणाऱ्या सुविधा होय, ज्यामध्ये पुढील बाबींचा अंतर्भाव नसेल:-

- मॉल्स
- सिनेमा थिएटर्स, सार्वजनिक सभागृहे आणि मल्टिप्लेक्सेस
- आम जनतेकरीता विक्रीसाठी असलेल्या रहिवासी सदनिका

तथापि, या मध्ये पुढील बाबींचा अंतर्भाव असेल:-

- लहान किरकोळ दुकाने ज्यांचे क्षेत्रफळ हजार चौ.फु पेक्षा जास्त नसावे आणि सदर वर्गवारीतील क्षेत्र एकूण पुरक सेवाच्या पाच टक्के पेक्षा जास्त नसावे

- व्यापारी मालाचे शोरूम, प्रशिक्षण संस्था, सामुहिक स्वरूपात उक्त घटकासाठी पुरक ठरणारे बाबींचे कार्यशाळा
- उक्त औद्योगिक संकुलने येथे काम करणाऱ्या कामगारांकरीता रहिवाशी सदनिका, ज्यांचे क्षेत्रफळ शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या झोपडपट्टी निर्मुलन प्राधिकरण (SR) करीता वेळोवेळी निश्चित केले जाईल इतक्या जास्तीत जास्त मर्यादेत चटई क्षेत्र राहील आणि सदर वर्गवारीतील अनुज्ञेय क्षेत्र एकूण पुरक सेवाच्या प्रमाण 20% च्या मर्यादेत राहील.
- या संदर्भात विकास आयुक्त (उद्योग) हे एखादया बाबीचे स्पष्टीकरण करण्यास सक्षम प्राधिकारी राहतील.

## 5. औद्योगिक संकुले (Industrial Parks):

A. कमीत कमी 20,000 चौ. फूट बांधकाम असलेल्या औद्योगिक इमारतीस औद्योगिक संकुल म्हणून स्थापित करता येईल. एकूण बांधकामापैकी कमीत कमी 80% क्षेत्र रेडिमेड गारमेंट निर्मीती, जेम्स ॲन्ड ज्वेलरी, सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील नोंदणीकृत प्रात्र MSME उत्पादन घटकांकरिता वापरणे बंधनकारक राहील. जास्तीत जास्त 20% क्षेत्र संबंधित पूरक सेवाकरिता वापरता येईल. (परिच्छेद 4.4 नुसार) नोंदणीकृत उत्पादन घटक म्हणजे (परिच्छेद 4.1 नुसार) उद्योग आधार धारक/पात्र घटक.

B. औद्योगिक पार्कसाठी राज्यात सर्वत्र 1 अथवा अनुज्ञेय असलेला जो जास्त असेल असा मूळ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय असेल व यावर 200% पर्यंत अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक रस्त्याच्या रुंदीची उपलब्धतेच्या अधीन राहून अनुज्ञेय असेल. उद्योग संचालनालयाने मान्यता दिलेल्या नोंदणीकृत सार्वजनीक व खाजगी उद्यानांना प्रचलीत रेडीरेकनर दरावर अधिमुल्यासहित किंवा शिवाय औद्योगिक पार्कच्या विकसनासाठी 200% अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक रस्त्याच्या रुंदीची उपलब्धतेच्या अधीन राहून खालील प्रमाणे अनुज्ञेय असेल :–

| क्र. | पार्कचे ठिकाण (पीएसआय 2013 मध्ये व्याख्या केल्यानुसार) | अधिमुल्य |
|---|---|---|
| 1. | शून्य उद्योग जिल्हा व नक्षलवाद प्रभावित क्षेत्र | काही नाही |
| 2. | पुणे, ठाणे, बृहन्मुंबई, कल्याण– डोंबिवली, मीरा भायंदर, पनवेल, उल्हासनगर, अंबरनाथ, नवी मुंबई हे महानगरपालिका विभाग, उद्योग जिल्हा व नक्षलवादाने प्रभावित विभाग यांच्या व्यतिरिक्त. | 10% |
| 3. | पुणे, ठाणे, बृहन्मुंबई, कल्याण –डोंबिवली, मीरा भायंदर, पनवेल, उल्हासनगर, अंबरनाथ, नवी मुंबई महानगरपालिका विभाग | 15% |

Government of Maharashtra

## 6. झोन निर्बंधांमध्ये शिथिलता

शेती, उद्योग किंवा व्यापार क्षेत्रासाठी रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स अँड ज्वेलरी, सुक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरीता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले पार्कची निकड लक्षात घेता, सदर धोरण राज्यभरातील सर्व विभागांमध्ये अनुज्ञेय असेल. कृषी व ना–विकास क्षेत्रासाठी अथवा औद्योगिक क्षेत्र वगळून ज्या क्षेत्रामध्ये झोन बदलाची आवश्यकता असेल अशा क्षेत्रामध्ये झोन बदल अधिमूल्याची आकारणी टाऊनशीप धोरणाच्या धर्तीवर रेडीरेकनर दराच्या 15% दराने केली जाईल.

## 7. आर्थिक प्रोत्साहने (Fiscal Incentives) (फक्त गारमेंट प्रकल्पासाठी)

राज्यातील पात्र सूक्ष्म, लघु, मध्यम व मोठया रेडिमेड गारमेंट निर्मीती उपक्रमांना सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत एक टप्पा वरील वर्गवारीनुसार प्रोत्साहने अनुज्ञेय होतील. (उदा. ब तालुक्यातील घटकांना क तालुक्यास लागू असलेली प्रोत्साहने प्राप्त होतील.)

गारमेंट प्रकल्पासाठी विशाल अतिविशाल उपक्रमांना खालीलप्रमाणे गुंतवणूक व रोजगारावर दर्जा देण्यात येईल.

| | अ व ब क्षेत्रे | | उद्योग विरहीत जिल्हे व नक्षलवाद प्रभावी क्षेत्र | | इतर क्षेत्रे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | गुंतवणूक (रु.कोटीत) | रोजगार | गुंतवणूक (रु.कोटीत) | रोजगार | गुंतवणूक (रु.कोटीत) | रोजगार |
| विशाल | 250 | 1500 | 50 | 250 | 100 | 250 |
| अति विशाल | रु. 500 कोटी गुंतवणूक व 3000 थेट रोजगार | | | | | |

A. विशाल/अतिविशाल प्रकल्पांसाठी पात्रता कालावधी 10 वर्षपेक्षा जास्त असल्यास प्रोत्साहने वितरणाची वार्षिक मर्यादा ही आर्थिक प्रोत्साहनाचे एकूण रकमेचा पात्रता कालावधीनुसारच्या वर्षाच्या संख्येने भागून निर्धारित करण्यात येईल. एखाद्या वर्षासाठीची प्रत्यक्ष मंजूर मर्यादा व वार्षिक प्रोत्साहने वितरण मर्यादा यामधील तफावत पुढील वर्षी विचारात घेण्याची तरतूद असेल.

B. उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्र.पीएसआय–2013/प्र.क्र.54/उद्योग–8, दिनांक 01 एप्रिल, 2013 आणि तद्नंतर मंत्रीमंडळ उपसमिती किंवा उच्चाधिकार समितीच्या निर्णयावर आधारीत निर्गमित केलेल्या शासन निर्णय किंवा मार्गदर्शक सूचनांनुसार, विशाल प्रकल्पांना देय प्रोत्साहने ठरविण्यात येतील. पात्र विशाल व अतिविशाल घटकाकरिता अनुज्ञेय गुंतवणूक कालावधी राज्याचा अ आणि ब क्षेत्रात 8 वर्ष व इतर क्षेत्रात 10 वर्ष इतका असेल. अशा उद्योगास दयावयाची एकत्रित सामूहिक प्रोत्साहने Template मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

C. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात एखाद्या पात्र प्रकल्पाने जर अनुज्ञेय विकास कालावधीच्या आत बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेऊन वाणिज्यिक उत्पादनास सुरुवात केली तर त्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला उर्वरित विकास कालावधी करीता, भरण्यात येणारे विविध शुल्क म्हणजे पाणी शुल्क, सेवा शुल्क, अग्निशमन उपकरातून खाली नमूद केल्याप्रमाणे सवलत अनुज्ञेय करण्यात येईल.

| अ.क्र. | इमारत पूर्णत्वाचा दाखला (BCC) | सवलतीचा प्रकार |
|---|---|---|
| 1 | किमान 50 % व 75% च्या आत | 100% सेवा शुल्कातून व अग्नीशमन उपकरातून माफी + पाणी शुल्कात 20% सवलत |
| 2 | किमान 75 % व 100% च्या आत | 100% सेवा शुल्कातून व अग्नीशमन उपकरातून माफी + पाणी शुल्कात 30% सवलत |
| 3 | 100 % | 100% सेवा शुल्कातून व अग्नीशमन उपकरातून माफी + पाणी शुल्कात 40% सवलत |

वरील सवलत घटकाच्या मूळ भूखंड विकसित कालावधी (Development Period) मधील उर्वरित (वरीलप्रमाणे इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करुन उत्पादनात गेल्याच्या दिनांकापासून) कालावधीकरिता अनुज्ञेय असेल.

D. या धोरणांतर्गत राज्य शासनाकडून देय करण्यात आलेली प्रोत्साहने ही केंद्र शासनातर्फे किंवा त्यांचे कोणत्याही यंत्रणेमार्फत किंवा स्थानिक प्राधिकरणामार्फत देय करण्यात आलेल्या प्रोत्साहनाशिवाय असतील.

E. मुद्रांक शुल्क परतावा :

पात्र गारमेंट घटकांच्या गुंतवणूक कालावधीमध्ये खरेदी करण्यात आलेल्या जमिनीची अथवा गाळेसाठी अथवा भाडेपट्टीने घेतलेल्या जमिनीकरीता अथवा गाळेसाठी देय करण्यात आलेल्या तसेच बँक कर्जाकरिता दस्तऐवजा वरील मुद्रांक शुल्काचा परतावा/सवलत राज्याच्या औद्योगिक धोरण- 2013 नुसार अनुज्ञेय असेल.

F. प्रत्येक वर्षी सूक्ष्म, लघु व मध्यम प्रकल्प उपक्रम (MSME) आणि मोठे उपक्रम (LE) यांना अनुज्ञेय असणाऱ्या एकत्रित सवलती (Basket of Incentives) अंतर्गत अनुदानाची रक्कम ही एकूण मंजूर एकत्रित सवलतींच्या 1/10 च्या मर्यादेपर्यंत असेल. प्रत्यक्ष मंजूर झालेले अनुदान आणि त्यावर्षी देय असलेले अनुदान यातील फरक पुढे देय (Carry Forward) केला जाईल.

## 8. औद्योगिक दराने वीज पुरवठा

रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स अँड ज्वेलरी, सुक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरीता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुले (Parks)/धोरण- 2018 मधील व्यावसायिक व व्यापारी सुविधांच्या व्यतिरिक्तच्या उपक्रमांसाठी औद्योगिक दराने वीज उपलब्ध करून देण्यात येईल. या धोरणातील घटकांना महाराष्ट्र वीज नियामक कंपनीच्या तरतुदीनुसार Power Distribution Franchises model स्वीकारता येईल. तसेच अपांरपारिक ऊर्जा स्त्रोताचा वापर करुन, वीज निर्मीती व वीज वितरण तसेच वीज विक्री संबंधित पार्क क्षेत्रात करण्याची मुभा असेल. याशिवाय महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (MSEDCL) कडून त्यांच्या अधिनियमातील तरतुदीनुसार अन्य कोणत्याही विद्युत निर्मीती करणाऱ्या कंपनीकडून वीज घेण्याची मुभा या धोरणातील घटकांना असेल. तसेच Substation to Switching Station मध्ये access approval देईल. याशिवाय विद्युत ग्राहक तारांमधून Substation Switching Station ला LILO of Power अनुज्ञेय राहील. या धोरणातील घटकांना 24X7 अखंडरित्या वीज पुरवठा एक्सप्रेस फीडर मार्फत करण्यात येईल.

## 9. सामाईक सुविधा केंद्र:

रेडिमेड गारमेंट निर्मिती, जेम्स अँड ज्वेलरी, सुक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स व अभियांत्रिकी घटक याकरीता फ्लॅटेड गाळायुक्त औद्योगिक संकुलासाठी सामाईक सुविधा केंद्र उभारण्यासाठी प्रकरण निहाय अवलोकन करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मदत करेल. तसेच खाजगी उद्योग स्वत:चे सामाईक सुविधा केंद्र उभारुन चालवतील. या केंद्रामध्ये प्रशिक्षण, परीक्षण, रचना इ. साठी सामाईक सुविधा असतील.

9.1 सर्व प्रकारच्या वर्गीकृत औद्योगिक क्षेत्रातील रेडीमेड गारमेट निर्मिती,जेम्स अँड ज्वेलरी या सूक्ष्म,लघू व मध्यम औद्योगिक उपक्रमांच्या पत पात्रता निर्धारणासाठी (क्रेडीट रेटींग) (एक वेळेस द्यावयाचे ) प्रोत्साहने रु. 40,000/- (रु चाळीस हजाराच्या मर्यादेत राहून भारतीय लघु उद्योग विकास बँक (SIDBI)/ शासनाच्या अधिकृत पतपात्रता निर्धारण अभिकरणाने (Government accredited Credit Rating Agency) केलेल्या पतपात्रता निर्धारण खर्चाच्या 75 टक्के इतकी प्रोत्साहनात्मक रक्कम देण्यात येईल.

## 10. ज्या खाजगी औद्योगिक संकुले (Industrial Parks)

यांनी प्रस्तुत धोरणातील तरतुदीनुसार अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांकाचा लाभ घेतला आहे आणि कालांतराने औद्योगिक संकुले (Industrial Parks) मधील बांधीव जागेचा वापर अनुज्ञेय असलेल्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी वापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, दंडात्मक कारवाई केली जाईल.

A. जे बांधीव क्षेत्र अनुज्ञेय असलेल्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी वापरले जात असेल, त्या बांधीव क्षेत्रासाठी प्रचलित रेडिरेकनर दराच्या 0.3 टक्के (तीन दशांश टक्के) प्रति दिवस इतकी रक्कम दंड म्हणून आकारली जाईल.

B. संबंधित खाजगी औद्योगिक संकुले (Industrial Parks) यांना उद्योग संचालनालय व ज्यांनी इमारत आराखडास मंजूर केला आहे असे नियोजन प्राधिकरण यांच्या अधिकारी वर्गाचा गट प्रत्यक्ष जागेला भेट देऊन बांधीव जागेच्या गैरवापराबाबत खात्री करेल.

## 11. औद्योगिक संकुले (Industrial Parks)च्या नोंदणी करणाबाबत.

माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहायभूत सेवा धोरण 2015 मधील माहिती तंत्रज्ञान उद्यानांना अवलंबलेली कार्यपध्दतीच्या धर्तीवर या धोरणांतर्गत सर्व खाजगी व सार्वजनिक रेडीमेड गारमेंट, जेम्स ॲन्ड ज्वेलरी, सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक व अभियांत्रिक घटकांची औद्योगिक संकुले (Industrial Parks) ना (LOI) आणि नोंदणीपत्र निर्गमित करण्यात येईल. उद्योग संचालनालयाकडून या संदर्भात स्वतंत्ररित्या मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येईल.

## 12. कामगार कल्याण सहाय्य (Workforce Welfare Assistance) :

केंद्र शासनाच्या नवीन वस्त्रोद्योग धोरणानुसार 3 वर्षाकरीता ज्यांचे उत्पन्न दरमहा रु. 15,000/- पेक्षा कमी आहे. अशा नवीन गारमेंट उद्योजकांच्या कर्मचाऱ्याचा कामगार निर्वाह निधी Employees Provident Fund Scheme मधील कर्मचाऱ्यांच्या निर्वाह निधीच्या अंशदान केंद्र शासन अदा करील. Employees Contricution of the Employees पोटीचे संपूर्ण 12% रकमेचा परतावा केंद्र शासनाकडून करण्यात येणार आहे. केंद्र शासनाकडील योजनेचा लाभ संपल्यानंतर महाराष्ट्र शासनाकडून उक्त प्रोत्साहने घटकांच्या पुढील 3 वर्षाच्या कार्यकाळाकरीता (Operations period of the unit) परतावा स्वरुपात देण्यात येईल.

## 13. प्रशिक्षण सहाय्यता :

घटकांच्या कार्यकाळ सुरू झाल्यापासून (Commencement of the operations) प्रारंभिक 3 वर्षाच्या कालावधीकरीता, रु. 3000, प्रतिवर्ष प्रति कर्मचारी या प्रमाणे महाराष्ट्र शासनाकडून प्रशिक्षण सहाय्यता गारमेंट घटकासाठी देण्यात येईल.

## 14. सीमा शुल्क तपासणी (Custom Clearance) :

प्राधिकाऱ्यांशी संपर्क साधून कालबध्द पध्दतीने वेळेत सीमाशुल्क तपासणी करणे आणि Star Express houses Status दर्जा देऊन तपासणी करणे पासून शिथीलीता (Relaxation) देणे बाबत कार्यवाही करण्यात येईल. यासाठी MAITRI मार्फत समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाईल.

## 15. धोरणाचा कालावधी :

सदरचे धोरण लागू झाल्यापासून पाच वर्षांपर्यंत अस्तित्वात राहील.

Government of Maharashtra

**DEPARTMENT OF INDUSTRIES, ENERGY AND LABOR**

Government of Maharashtra,
Mantralaya, Mumbai – 400032
Tel.: (91-22) 22025393
**Website: https://www.maharashtra.gov.in/**

**DIRECTORATE OF INDUSTRIES**

Government of Maharashtra,
New Administrative Building,
2nd floor, Opp. Mantralaya,
Mumbai – 400032
Tel.: (91-22) 22023584/22028616
**Website: https://di.maharashtra.gov.in/**

**MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION (MIDC)**

Udyog Sarathi, Mahakali Caves Road,
Andheri East, Mumbai, Maharashtra 400093
Tel.: (91-22) 26870800
**Website: https://www.midcindia.org/**

**MAHARASHTRA INDUSTRY, TRADE AND INVESTMENT FACILITATION CELL (MAITRI)**

"Krupanidhi" Building, 9,
Walchand Hirachand Marg,
Ballard Estate, Mumbai – 400001
Tel.: (91-22) 22622362
**Email id: maitri-mh@gov.in**
**Website: https://maitri.mahaonline.gov.in/**